# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(दुपार)

**दिनांक १९.०९.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची म.दा.का., जुगार व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक १८.०९.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ कायद्यान्वये १३ केसेसमध्ये १४ ईसमावर कारवाई करून एकुण २,७६,०७०/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये ०५ केसेसमध्ये ०५ इसमांवर कारवाई करून एकुण ३०,८११/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

**वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विना हेल्मेट गाडी चालविणे कलम १२९/१७७ मोवाका अन्वये १८३४ केसेस, ड्रंकन ड्राईव्ह कलम १८५ मोवाका अन्वये १६ केसेस, ओव्हरस्पिडींग बाबत कलम ११२/१८३ मोवाका अन्वये ६० केसेस, सिग्नल जंपींग कलम २३९/१७७ मोवाका अन्वये ०६ केसेस, विना परवाना वाहन चालविणे कलम १३० मोवाका अन्वये १४५ केसेस, ऑन रोड पार्कींग कलम १२२/११७ मोवाका अन्वये १५१ केसेस, रॉग साईड कलम ४/१२२ मोवाका अन्वये २७ केसेस, अवैध प्रवासी वाहतुक कलम १९४ए मोवाका अन्वये १७ केसेस, ड्रायव्हींग विदाऊन युनिफार्म कलम २१/१८ मोवाका अन्वये ०६ केसेस, ट्रिपलसिट वाहन चालविणे कलम १२८/१७७ मोवाका अन्वये ८१ केसेस, बेदरकारपणे वाहन चालविणे कलम १८४ मोवाका ०५ केसेस, फॅन्सी नंबरप्लेट कलम ५१/५० सीएमव्हीआर अन्वये ०७ केसेस, विटाऊट सिटबेल्ट ड्रायव्हींग कलम १९४बी(१) मोवाका अन्वये ३१ केसेस, वाहन चालवितांना भ्रमणध्वनीचा वापर करणे ०४ केसेस, व इतर कलमांखालील गुन्हे असे एकुण २,३५० वाहन चालकांवर कारवाई करून त्यांचेकडून एकूण रू. १२,६०,९५०/—रू. इतके तडजोड शुल्क वसूल केले आहे.**

**दिनांक १८.०९.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक १९.०९.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये ०३ इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे**.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) कळमना पोलीसांची कामगिरी :— गोडावुन मधुन सुपारी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक.**

फिर्यादी हनिफ हारूण किडीया, वय ६३ वर्षे, रा. प्लॉ. नं. ४०१, मुनलाईट इन्क्लेव्ह, मस्के ले—आऊट, कावरापेठ, शांतीनगर, नागपूर यांचे पोलीस ठाणे कळमना हद्दीत, पावनगांव ते धारगांव रोडवरील, डि.के. फार्मचे बाजुला, कॅपीटल ट्रेडर्स नावाचे सुपारी खरेदी—विक्री व्यवसायाचे गोडावुन आहे. दिनांक १२.०९.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक १४.०९.२०२६ चे १०.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे गोडावुनचे शटर उचकावुन, आंत प्रवेश करून, गोडावुनमध्ये ठेवलेली सुपारी ५० किग्रॅ वजनाच्या ९४ बॅग व डिव्हीआर असा एकुण १८,०५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस

ठाणे कळमना येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासादरम्यान, कळमणा पोलीसांनी तांत्रिक तपास करुन तसेच, परिसरातील व टोलनाक्यावरील सीसीटिव्ही फुटेजची पाहणी करुन, संशयीत मालवाहु वाहनाची माहिती प्राप्त केली व नमुद चोरीकरीता वापरलेले अशोक लेलॅन्ड कंपनीचे वाहन क्र. एमएच ४९ बीझेड ९१३२ असल्याचे निष्पन्न केले. आरोपींबाबत खात्रीशीर माहिती प्राप्त करून, आरोपी १) नितेश शिवरतन भवरीया, वय ३६ वर्ष, रा. क्वॉर्टर क्र आय/९०, प्रेमनगर, शांतीनगर, नागपूर २) शुभम महेंद्र मराठे, वय २७ वर्ष, रा. नवीन नगर, शितलामाता मंदीर, बाजार चौक, गल्ली क्र. १२, पारडी, नागपूर ३) मोहम्मद शहजाद उर्फ अतिक मोहम्मद सईद, वय ३७ वर्ष, रा. नारा घाट जवळ, जरीपटका, नागपूर ४) मोहम्मद इरफान उर्फ बाबा मोहम्मद शमी शेख, वय ३५ वर्ष, रा. सागर कॉम्प्लेक्स, सतरंजीपुरा, मोठ्या मस्जिदसमोर, लकडगंज, ५) अरविंद उर्फ बंटीयेडा अशोक घनसुरे, वय ३३ वर्ष, रा. प्लॉट क्र. ५७७, गल्ली क्र. ५, पाटील किराणा जवळ, जरीपटका, नागपूर यांना ताब्यात घेतले. आरोपींना विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद सुपारीचे गोडावून फोडून चोरीचा गुन्हा संगनमताने केल्याची कबुली दिली. आरोपींचे ताब्यातुन ५० किलो वजनी सुपारीचे एकूण ८५ पोते, वर नमुद अशोक लेलॅन्ड कंपनीची मालवाहु गाडी, महेंद्रा बोलेरो पिकअप गाडी क्र. एमएच ४९ सीडब्ल्यू ००५३ व ०२ मोबाईल फोन असा एकूण कि. २६,३८,७५०/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. आरोपींचा अभिलेख तपासला असता, पाचही आरोपी सराईत गुन्हेगार असून, त्यांचेवर गोडावून फोडीचे व इतर गंभीर गुन्हे दाखल असल्याचे दिसून आले. आरोपींना अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. नित्यानंद झा, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ५), मा. श्री. रोहीत ओव्हाळ, सहा. पोलीस आयुक्त (कळमणा विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. प्रविण काळे, दुपोनि. करीम पठान, पोउपनि. गजानन राऊत,, पोहवा. प्रमोद कंगाले, विशाल भैसारे, पोअं. नितीन मिश्रा, ललित शेंडे, अविनाश ग्वालबंशी, रोशन निंबर्ते यांनी पोलीस उपआयुक्त, सायबर पथकाचे पोअं. प्रविण ईनवाते यांचे विशेष सहकार्याने केली.

**<u>३) गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पथकाची कामगिरी :— अंमली पदार्थ एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.</u>**

दिनांक १८.०९.२०२६ चे २१.५५ वा. ते १९.०९.२०२६ चे ०२.०० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा युनिट क्र. ६ पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे पाचपावली हद्दीत, ऑटोमोटीव्ह चौक, जेसीबी कंपनीसमोरीज शेरे पंजाब लॉनसमोर एक नेक्सॉन कार उभी असुन त्यामधील इसम एमडी पावडर विक्रीकरीता बाळगुन आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन नमुद ठिकाणी गेले असता, तेथे प्राप्त वर्णनाची कार व त्याशेजारी एक ॲक्टिवा मोपेड उभी दिसली. बारकाईने पाहणी केली असता, त्यामध्ये दोन इसम संशयीतरित्या हालचाली करतांना दिसुन आले. कारजवळ जाऊन कारमधील इसमांना पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांची नावे १) मनोज मोहनलाल गुप्ता, वय ३० वर्षे, रा. शाहु मोहल्ला, यशोधरानगर, नागपूर २) रिचर्ड प्रणोत फेड्रीग्ज, वय २४ वर्ष, रा. कपीलनगर, नागपूर असे सांगीतले. त्यांचे ताब्यात अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन, एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करुन, त्यांचे ताब्यातील कारची पाहणी केली असता, कारमध्ये अंमली पदार्थ एम.डी पावडर वजनी १८ ग्राम मिळुन आली. आरोपींना अधिक विचारपुस केली असता, त्यांनी त्यांचा साथीदार पाहिजे आरोपी लक्कु शाहु रा. यशोधरानगर याचेकडून विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपींचे ताब्यातुन रोख ५००/—रू., एम.डी पावडर, ०२ मोबाईल फोन, ॲक्टिवा मोपेड व टाटा कंपनीची नेक्सॉन कार असा एकुण १२,२३,०००/—रू. चा मुद्देमाल

जप्त करण्यात आला. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी पावडर विक्रीकरीता बाळगताना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे पाचपावली येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव पाचपावली पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. भारत कऱ्हाडे, सपोनि. सचिन गायकवाड, पोउपनि. राहुल रोटे, सफौ. मुकेश खांडरे, पोहवा. जयंत नांदेकर, नारायण पारवेकर, पोअं. विरेंद्र पांडे, निलेश श्रीपात्रे, प्रफुल्ल पारधी, लक्ष्मीकांत सोनटक्के, रविंद्र राऊत व चापोहवा. मनिष मिश्रा यांनी केली.



**४) सक्करदरा पोलीसांची कामगिरी :— गांजा बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक १८.०९.२०२६ चे १५.५० वा. ते १७.२५ वा. चे दरम्यान, सक्करदरा पोलीसांचे तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, मोठा ताजबाग परिसरातील मुस्लिम कब्रस्तानजवळील सुफी अली मोहम्मद गौस दर्गाहचे बाजुला सार्वजनिक ठिकाणी काळ्या रंगाचे जॉकेट घातलेले २० ते २५ वर्ष वयोगटातील दोन इसम बॅग घेऊन संशयीतरित्या दिसुन आले. त्यांचेजवळ जात असता, ते पोलीसांना पाहून पळण्याचे तयारीत असता, त्यांना घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारला असता, त्यांनी त्यांची नावे १) रागल्ला भुवन रागल्ला राजेशम, वय २१ वर्ष, रा. घर क्र. ३/२७, वेंगलाईपेठ गाव, पोलीस ठाणे पेगडापेल्ली, जि. जगतियाल (तेलंगाना) २) निम्मा विजय श्रीनिवास, वय २० वर्ष, घर क्र. ५/९८, मु.पो. बठकेतेल्ली, पोलीस ठाणे पेगडापेल्ली, जि. जगतियाल (करीमनगर), राज्य तेलंगाना असे सांगितले. त्यांची व त्यांचे ताब्यातील बॅगची झडती घेतली असता, बॅगमध्ये पिवळसर रंगाचे पिशवीमध्ये अंमली पदार्थ हिरव्या रंगाचा गांजा एकुण वजनी १ किलो ३०० ग्राम मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन गांजा, ०२ मोबाईल व रोख २००/—रू., व बॅग असा एकुण ९०,६००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींची सखोल विचारपूस केली असता, त्यांनी त्यांचा साथिदार पाहिजे आरोपी नामे फरहानभाई नावाचे इसमाचे मदतीने विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२०(ब)(ii)(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे सक्करदरा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४), मा. श्री महेश चव्हाण, सपोआ, सक्करदरा विभाग, वपोनि. श्री रमेश खुणे यांचे मार्गदर्शनाखाली, दुपोनि. मनोज पवार, पोउपनि. चेतनसिंग राजपुत, प्रकाश सिडाम, सफौ. शैलेष बेदोडकर, पोहवा. धमेंद्र नितनवरे, ज्ञानेश्वर बांते व मपोहवा. रसिका घायवट यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे सदर :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता कोंडुन ठेवणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १८.०९.२०२६ चे ०८.३० वा. चे सुमारास, सदर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, गड्डीगोदाम रेल्वे बोगद्याजवळील प्रजापती बुध्द विहारसमोर गोवंशीय जनावरांना कत्तलीकरीता बांधून ठेवलेले आहे. अशा मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, नमुद ठिकाणी जावुन पंचासमक्ष पाहणी केली असता, तेथे ०८ लहान मोठे गोवंशीय जनावरांना अत्यंत क्रुरपने व निर्दयतेने दाटीवाटीने कोंडून चारापाणी न देता कत्तलीकरीता बांधून ठेवल्याचे तसेच, तेथे एक इसम संशयीतरित्या दिसुन आले. तो इसम पोलीसांना पाहून पळण्याचे तयारीत असता, त्यास घेराव टाकुन ताब्यात घेऊन, पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव दुर्गेश रमेश वर्मा, वय ३५ वर्ष, रा. वार्ड क्र. २, नगरपंचायत पिपरा थाना, जि. गोरखपुर, ह.मु. गड्डीगोदाम, लाल शाळा ग्राऊंडजवळ, सदर, नागपूर असल्याचे सांगून, नमुद जनावरे ही त्याची असल्याचे सांगितले. अधिक चौकशी केली असता, आरोपीने गोवंशीय जनावरांना अवैधरित्या कत्तलीकरीता बांधुन ठेवल्याचे निष्पन्न झाले. घटनास्थळाहुन एकुण ०८ गोवंशीय जनावरे किंमती अंदाजे ९०,०००/—रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गोवंशीय जनावरे यांना गौरक्षण केंद्र, नागपुर येथे दाखल करण्यात आले आहे. पोलीस ठाणे सदर येथे पोउपनि. धनाजी पिसे यांनी आरोपींविरूध्द कलम ५,५(ब),९,९(ब) महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम—१९७६, सुधारणा कायदा १९९५, सहकलम ३,११(१) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६० अन्वये सहकलम ११८,११९ मपोका अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**( नितीन चुलपार )**
**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**